प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

अंक ५२/२०१० | दिनांक २९/०६/२०१० | कालावधी ५ दिवस

| मागील हवामान सारांश दि. २४/०६/१० ते २८/०६/१० | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ९०.४ |
| पाऊस (मिमी) १/१/१० पासून | : | ११३८.७ |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | २५०.२ |
| कमाल तापमान (अं.से) | : | २६.४–२९.६ |
| किमान तापमान (अं.से) | : | २१.९–२४.१ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (:%) | : | ९८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%:) | : | ७६–९७ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ३.६–६.१ |

| हवामान पूर्वानुमान (३०/०६/२०१० सकाळी ८:३० पासून ०४/०७/२०१० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| हवामानांचे घटक | : | ३०/०६ | ०१/०७ | ०२/०७ | ०३/०७ | ०४/०७ |
| पाऊस (मिमी) | : | २६ | १८ | २० | २६ | २२ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३० | २९ | २९ | २९ | २९ |
| किमान तापमान (अं.से) | : | २६ | २६ | २६ | २५ | २५ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ७ | ८ | ८ | ८ | ८ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%:) | : | ९७ | ९८ | ९८ | ९६ | ९४ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (:%) | : | ९४ | ९५ | ९६ | ९६ | ९४ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००९ | ०११ | ००९ | ०१९ | ००९ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. | नै.द. |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**पुढील सात दिवसात ११५ मि.मी. पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.**

कमाल तापमान दि **३०/०६ रोजी ३० ° से. आणि ०१/०७ ते ०४/०७ पर्यत २९ ° से. राहील.** तर किमान तापमान दि ३०/०६ ते ०२/०७ पर्यत २६ ° से. आणि ०३/०७ व ०४/०७ रोजी २५ ° से. राहील. वातावरण दि ३०/०६ ते ०४/०७ पर्यत पूर्णत: मेघाच्छादित राहील. वाऱ्याच्या वेगात ०१/०७ व ०३/०७ रोजी वाढ संभवते.

| | |
|---|---|
| **भात, नागली** | भाताची रोपे २० ते २५ दिवसांची झाली असल्यास रोपांची लावणी (पूर्णलागवड) सुरु करावी. लावणीपूर्वी चिखलणीसाठी शेतात पुरेसे पाणी साठविण्यासाठी बांधबंदिस्ती करावी. चिखलणीचे वेळी प्रति गुठां क्षेत्रास ५० ते १०० किलो उपलब्धेतेनुसार गिरीपुष्पाचा पाला ८८० ग्रॅम युरिया ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ८५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश खताचा हप्ता द्यावा. भात रोपवाटिकेत खेकडयांचा प्रादुर्भाव दिसून येत असेल तर त्यांच्या नियंत्रणासाठी खेकडे पकडून मारावेत. पावसामुळे शेताचे बांधावर गवत वाढले असल्यास त्याचे नियंत्रणासाठी पावसाची उघडीप पाहून ग्रामोक्झोन या तणनाशकाची ३ मिलि प्रति लिटर या प्रमाणात फवारणी करावी. फवारणीचेवेळी ग्रामोक्झोन तणनाशक रोपवाटिकेतील रोपांवर पडणार नाही याची काळजी घ्यावी. खरीप हंगामात भुईमूगाचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांनी भुईमूग पेरणी करुन घ्यावी. त्यासाठी कोकण गौरव, कोकण टपोरा, टिजी–२६, एसबी–११, आणि फुले प्रगती इ. जातीच्या बियाण्याची निवड करावी. |
| **भाजीपाला** | लागवड करण्यात आलेल्या भेंडी व इतर वेलवर्गीय भाज्याच्या अळयामध्ये/सरीमध्ये पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच भेंडी व इतर वेलवर्गीय कोवळया रोपांवर पाने खाणारी अळी, पाने गुडाळणारी अळी, भुंगेरे यांचा प्रादुर्भाव दिसताच त्यांच्या नियंत्रणासाठी इंडोसल्फॉन १५ मिली किंवा मोनोक्रोटोफॉस १० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी शक्यतो पावसाची उघडीप असताना करावी. |
| **आंबा** | आंबा रोपे तयार झाली असल्यास योग्य ती पूर्व तयारी करून चांगल्या मातृवृक्षापसून काडया घेवून कोय कलमे बांधण्यास. सुरवात करावी. |
| **आंबा व फळझाडे लागवड** | कलम लावताना भरलेल्या खडडयाच्या मध्यभागी कलमाचा हुंडीच्या आकाराहून थोडी जास्त माती बाहेर काढून छोटा खडड्ा तयार करावा वाळवीचा प्रादुर्भाव होवू नये म्हणून १०० ग्रॅम फॉलीडॉल किंवा ५० ग्रॅम क्लोरापायरीफॉसचे दाणे टाकावेत. कलम असलेली प्लॅस्टिकची पिशवी बाजूला काढावी यावेळी कलमाची हुंडी फुटणार नाही याची काळजी घ्यावी कलम छोटया खड्डमध्ये ठेवून त्याभोवती माती भरावी आणि घट्ट दाबावी. कलमाचा जोड जमिनीच्यावर पृष्ठभागानजिक ठेवावा आणि कलमाला लगेच काठीचा आधार द्यावा. |
| **नारळ व सुपारी** | नारळातील बुरशीजन्य रोगामुळे होणारी फळगळ तसेच सुपारीवरील कोळेरोग (फळगळ) यांचे नियंत्रणासाठी १% बोर्डोमिश्रणची फवारणी पावसाळयाअगोदर करावी. सुपारीसाठी ही फवारणी पानाचे बेचक्यात करावी. |
| **दुभती जनावरे** | पावसाळयांतील चार महिन्यासाठी जनावरांसाठी लागणारा सुका चारा, वैरण, पशुखाद्य इ. पुरेसे साठवून ठेवावे. सध्याच्या ढगाळ आणि पावसाळी वातावरणामुळे त्यांचे आजारावर पशुवैद्यांचे सल्ल्याने उपाययोजना करावी. जनावरांना स्वच्छ पाणी आणि संतुलित आहार देण्याची व्यवस्था करावी. |
| **शेळया** | शेड व शेळयांचे नियमित स्वच्छतेकडे लक्ष द्यावे. बुळकांडी, फऱ्या यासारख्या रोगांसाठी पशुवैद्यांचे सल्याने उपाययोजना करावी. शेळयांना होणाऱ्या जंतांच्या प्रादुर्भावासाठी त्यांचा संडास तपासून त्यांना फेबेंडाझॉल ५ मि.ग्रॅम प्रति किलो वजन या प्रमाणात द्यावे. |
| **कुकुटपालन** | शेड आणि पक्षांचे नियमित स्वच्छतेकडे लक्ष द्यावे. राणीखेत रोगासाठी पशुवैद्यांचे सल्याने लसीकरण करुन घ्यावे. |
| **मत्स्यपालन** | पुढील हंगामासाठी मत्स्यबीजाची मागणी शासकीय मत्स्यविभाग येथे नोंदवावी. रंगीत मत्स्यसंवर्धन कार्यक्रम सुरु करावा. गोडया पाण्यातील मत्स्यसंवर्धनासाठी तलावाची बांधणी पूर्ण करावी. |
| **सुचना** | निरनिराळे किड रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकचे कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांना भेटावे. |